# भूमिगत मेट्रोची पहिली चाचणी यशस्वी

आपलं महानगर वृत्तसेवा

मुंबई । मुंबईच्या पहिल्या भूमिगत मेट्रोने रविवारी बोगद्यातून धावण्याची पहिली चाचणी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसीएल)ने एमआयडीसी स्थानक ते विद्यानगरी स्थानकांदरम्यान भूमिगत अंतराची पहिली चाचणी घेतली. इंडियन टेक अँड इन्फ्रास्ट्रक्चरने सोशल मीडियावर यासंदर्भातील व्हिडीओ शेअर केले आहेत. कफ परेड ते आरे अशी ३३.५ किमी अंतराचा मेट्रो-३ चा मार्ग असणार आहे.